# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः02.10.2024** **वारःबुधवार**

---

1. स्वच्छ भारत मिशनच्या दशकपूर्तीनिमित्त आज नवी दिल्लीत विशेष उपक्रम; पंतप्रधान सहभागी होणार
2. राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त देशभरात विविध कार्यक्रमांचं आयोजन
3. पूरग्रस्त राज्यांना केंद्राकडून मदतनिधी; महाराष्ट्राला सर्वाधिक 1 हजार 492 कोटी रुपयांची मदत आणि
4. कानपूर क्रिकेट कसोटीमध्ये बांगलादेशवर 7 गडी राखून मात करत भारताचं मालिकेत निर्भेळ यश

**पंतप्रधान**

राष्ट्रपिता महात्मा गांधीजी यांच्या 155 व्या जयंतीनिमित्त नवी दिल्लीत आयोजित स्वच्छ भारत दिवस 2024 या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सहभागी होणार आहेत. स्वच्छ भारत मिशन या देशव्यापी महामोहिमेच्या दशकपूर्तीनिमित्त या उपक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. स्वच्छतेशी संबंधित 9 हजार 600 कोटी रुपयांच्या विविध प्रकल्पांची पायाभरणी यावेळी पंतप्रधानांच्या हस्ते होणार आहे.

**उपक्रम-रत्नागिरी**

रत्नागिरीतले युवा उद्योजक गौरांग आगाशे यांच्या फूड डिलिव्हरी ॲपच्या माध्यमातून शहर परिसरातल्या नागरिकांकडून प्लास्टिक कचऱ्याचं मोफत संकलन केलं जातं; तसंच त्याचं पुनर्चक्रीकरणही केलं जातं. 'स्वच्छता ही सेवा' या अभियानाच्या अनुषंगानं त्यांनी व्यक्त केलेले विचार...

**गांधी वंदना**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची आज 155 वी जयंती आहे. या निमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांना आदरांजली अर्पण केली आहे. सत्य, अहिंसा, प्रेम ही मूल्य आत्मसात करून महात्मा गांधींच्या स्वप्नातला भारत वास्तवात आणण्याचा संकल्प करण्याचं आवाहन राष्ट्रपतींनी केलं आहे. गांधी जयंतीनिमित्त आज देशभरात अनेक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं असून नवी दिल्लीतील राजघाट इथल्या बापूंच्या समाधीवर सर्वधर्मीय प्रार्थना सभा होणार आहे. देशाचे माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांचीही आज जयंती आहे; त्यानिमित्त आज त्यांचंही स्मरण केलं जात आहे.

**पूरग्रस्त राज्य मदत**

पूरग्रस्त 14 राज्यांच्या मदतीसाठी केंद्र सरकारनं 5 हजार 850 कोटी रुपयांचा निधी वितरित केला आहे. त्यामध्ये महाराष्ट्राला सर्वाधिक म्हणजे 1 हजार 492 कोटी रुपयांचं आर्थिक सहाय्य मिळालं आहे. याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचे आभार मानले आहेत.

**मुख्यमंत्री-सांगली**

सर्वाधिक योजना राबवल्या जाणारं महाराष्ट्र हे देशातलं पहिलं राज्य आहे. असं प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल सांगली जिल्ह्यातील विटा इथल्या शेतकरी मेळाव्यात केलं. यावेळी त्यांच्या हस्ते टेंभू योजनेच्या सहाव्या टप्प्याचं भूमिपूजन

करण्यात आलं. या योजनेच्या कामासाठी 2 हजार 124 कोटी 50 लाख रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. कोल्हापूरमध्ये कणेरी मठात आयोजित संत समावेश कार्यक्रमाच्या समारोप सत्रातही काल मुख्यमंत्री सहभागी झाले होते.

**तटकरे**

माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी महिलांच्या खात्यातून सेवा शुल्क कपात करणाऱ्या बँकावर कारवाईचा इशारा महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिला आहे. या योजनेसंदर्भात काल दूरस्थ माध्यमातून राज्यस्तरीय आढावा बैठक घेण्यात आली. त्यावेळी तटकरे बोलत होत्या.

**शहा**

राज्यात विधानसभा निवडणुकानंतर महायुतीचंच सरकार येणार असून कोणत्याही सर्वेक्षणांचा विचार न करता, निराश न होता झटून कामाला लागा, असा संदेश केंद्रीय गृहमंत्री आणि भाजपाचे वरिष्ठ नेते अमित शहा यांनी काल पक्षाच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना दिला. शहा दोन दिवसांच्या महाराष्ट्राच्या दौऱ्यावर असून काल त्यांनी मुंबईमध्ये भाजपा कार्यकर्त्यांशी संवाद साधला. त्यानंतर त्यांनी नवी मुंबईत वाशीमध्येही कार्यकर्त्यांच्या संवाद बैठकीत मार्गदर्शन केलं.

**आव्हाड**

महाविकास आघाडीचं जागावाटप दसऱ्याला जाहीर होणार आहे. आतापर्यंत 200 पेक्षा अधिक जागांवर एकमत झाल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी दिली. आता डावे पक्ष आणि इतर संघटनांसोबत चर्चा सुरू असल्याचं ते म्हणाले.

**वर्धापनदिन**

नादमधुर संगीत, नभोनाट्य, श्रुतिका, चर्चा, परिसंवाद आणि जगभरातील घडामोडी टिपणाऱ्या निःपक्ष बातम्या याद्वारे सर्व वयोगटातील असंख्य श्रोत्यांची सतत साथसंगत करणारं आणि गेल्या तीन चार पिढ्यांना श्रवणसमृद्धीचं वरदान देणारं आकाशवाणीचं पुणे केंद्र आज आपला 71 वा वर्धापनदिन साजरा करत आहे. 1953 मध्ये आजच्याच दिवशी पुणे केंद्राची स्थापना करण्यात आली. त्यानंतर आजतागायत पुणे केंद्रानं 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' हे आपलं ब्रीद व्रतस्थपणे जपलं आहे.

**जाधव**

जालना तसंच बुलडाण्यासह राज्यातल्या नव्यानं मान्यता मिळालेल्या आठ वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये याच शैक्षणिक वर्षापासून अभ्यासक्रम सुरू होणार असल्याचं केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी सांगितलं. ते काल बुलडाणा इथं पत्रकार परिषदेत बोलत होते. देशभरात वैद्यकीय अभ्यासक्रमातील पदव्युत्तरच्या जागांमध्ये गेल्या दहा वर्षात सुमारे 60 हजार 800 जागा वाढल्या असल्याचं ते म्हणाले.

**दवाखाने**

एसटी महामंडळाच्या 343 बस स्थानकांवर 'आनंद आरोग्य केंद्र' हे दवाखाने सुरू होणार आहेत. याठिकाणी सर्व नागरिकांना डॉक्टरांच्या सल्ल्यासह कमी दरात विविध चाचण्या आणि औषधं मिळणार आहेत. महामंडळाचे अध्यक्ष भरत गोगावले यांच्या अध्यक्षतेखाली काल झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत हा निर्णय झाला.

**नवापक्ष**

माजी खासदार संभाजीराजे छत्रपती यांनी स्थापन केलेल्या स्वराज्य संघटनेची 'महाराष्ट्र स्वराज्य पक्ष' या नावानं भारतीय निवडणूक आयोगाकडे राजकीय पक्ष म्हणून नोंदणी करण्यात आली आहे. सप्त किरणांसह पेनाचं निब हे या पक्षाचं चिन्ह असणार आहे. आगामी निवडणुकीत 'महाराष्ट्र स्वराज्य पक्ष' या नावानं निवडणूक लढवणार असल्याचं संभाजीराजे यांनी समाजमाध्यमांवर म्हटलं आहे.

**<u>क्रिकेट</u>**

कानपूर क्रिकेट कसोटी सामन्यात भारतानं बांगलादेशावर सात गडी राखून मात केली आणि दोन सामन्यांच्या या मालिकेत निर्भेळ यश मिळवलं. सामन्याच्या कालच्या अखेरच्या दिवशी भारताला जिंकण्यासाठी 95 धावांची आवश्यकता होती. भारतीय संघानं सतरा षटकं आणि दोन चेंडूत तीन गडी गमावत 98 धावा केल्या. रविचंद्रन अश्विन मालिकावीर तर यशस्वी जैस्वाल सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला.

**<u>हवामान</u>**

येत्या 24 तासात कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.